नियमीत फौजदारी खटला क्र. ८/२०२५
निशाणी क्र. **१६/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **सनी सुभाष गोळे** |
| वय सुमारे | : | २१ वर्षे, व्यवसाय : गॅरेज |
| निवासस्थान | : | मु. वावे, ता. अलिबाग, जि. रायगड |

**सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एस्. एम्. छापेकर यांचेमार्फत** :

माझ्या घरात मी, माझे वडील व एक छोटी बहीण असे राहतो. माझे वावे येथे चारचाकीचे गॅरेज आहे. सकाळी ८.०० वाजता मी गॅरेजमध्ये येतो व रात्री ९.०० वाजता गॅरेज बंद करतो. माझी मागील वर्षी इयत्ता १२ वी झालेली आहे. सन २०२४ मध्ये मी इयत्ता १२ वीत होतो.

०२. दि. ०८/१२/२०२४ रोजी रात्री ८.०० वाजता मी माझ्या दुकानाच्या पाठीमागील बाजूस अभ्यास करत बसलो होतो. त्यावेळी रोहीत वाघमारे आला व त्याने मला सांगितले की, माझी बाईक बंद पडलेली आहे तिचे काम कर. त्यावर मी त्याला म्हणालो की, मी टू व्हीलरचे काम करत नाही फक्त फोर व्हीलरचे काम करतो. त्यावर तो मला शिवीगाळ करु लागला. तो मला आईवरुन शिवीगाळ करु लागला. त्यानंतर तो बाहेर निघून गेला व जाताना समोरील दगड दोन वेळा उचलून जागेवर आपटला. तो त्यावेळी नशेत होता.

०३. त्यानंतर त्याचे वडील व नातेवाईक हे माझ्या गॅरेजच्या आत आले व मला शिवीगाळ करु लागले. ते तिघेही दारु प्यायलेले होते. त्यांनी मला

धक्काबुक्की केली व गॅरेज बंद करीन अशी धमकी दिली. त्यानंतर रोहीत याने बियरची बाटली आणली व माझ्या डोक्याच्या डाव्या बाजूला बाटली मारली. त्यामुळे माझ्या डोक्यातून रक्त येवू लागले. त्यानंतर माझा आवाज ऐकून माझे वडील, आई, काकाकाकी आले. त्यानंतर आरोपींनी सर्वांना मारहाण करण्याचा प्रयत्न केला. माझ्या घरातील सर्व लोक अपंग असल्यामुळे त्यांना आरोपींनी मारहाण करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आम्ही पोलीस ठाण्यात गेलो व आरोपींविरुद्ध तक्रार दिली.

०४. पोलीस ठाण्यात गेल्यानंतर पोलीसांनी मला हॉस्पीटलमध्ये पाठविले होते व हॉस्पीटलमधून आल्यानंतर पोलीसांनी माझी फिर्याद नोंदवून घेतली. आता मला दाखवण्यात आलेली फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. १७** देण्यात येते. आता मला दाखवण्यात आलेली छापील खबर तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. १८** देण्यात येते.

०५. त्यानंतर पोलीस पंचनामा करण्यासाठी माझ्या गॅरेजमध्ये आले होते. पोलीसांनी घटनास्थळाचे फोटो काढले होते व पंचनामा केला होता. बियरची बाटली मारल्यामुळे माझ्या डोक्याला आठ टाके पडले होते. मला ज्या बियरच्या बाटलीने मारले होते ती दाखवल्यास मी ओळखू शकेन. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत. मी त्यांना ओळखतो.

**पुढील सरतपास मुद्देमाल दाखल करेपर्यंत तहकूब**

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **१९/०६/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

**<u>पुढील सरतपास सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एस्. एम्. छापेकर यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>** :

०६. मला ज्या बाटलीने मारहाण केली ती दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेली बियरची फुटलेली बाटली तिच आहे. त्यास **भौतिक वस्तू–१** (**MO-1**) देण्यात येत आहे. बियरची बाटली माझ्या गॅरेजमधून घटनास्थळाचा पंचनामा करतेवेळी जप्त करण्यात आली होती. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. गौरव पाटील यांचेमार्फत</u>** :

०७. माझे शिक्षण इयत्ता १२ वी पास आहे. मी माझी फिर्याद वाचून पाहिलेली होती. मी माझ्या फिर्यादीमध्ये सर्व घटना सांगितली होती. मी फक्त शिवी सांगितली नव्हती. पोलीसांना फिर्याद देताना मी दुकानाच्या पाठीमागील बाजूस अभ्यास करत बसलो होतो ही बाब सांगितली होती. सदर बाब माझ्या फिर्यादीमध्ये का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सांगण्याप्रमाणे आरोपी रोहीत हा घटनेच्या वेळी दारु प्यायलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे पहिल्यांदा फक्त आरोपी रोहीत हाच गॅरेजमध्ये आला होता. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद देताना मी सांगितले नव्हते की, आरोपी मला आईवरुन शिवीगाळ करत होता. हे म्हणणे खरे आहे की, पहिल्यांदा आरोपी गॅरेजमध्ये आला होता त्यावेळी त्याच्या हातात बियरची बाटली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, 'त्यानंतर तो बाहेर निघून गेला व जाताना समोरील दगड दोन वेळा उचलून जागेवर आपटला' हे मी प्रथमच कोर्टात सांगत

आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ व ३ माझ्या गॅरेजमध्ये आले व शिवीगाळ करु लागले त्यापूर्वी माझ्या घरचे लोक तिथे आले नव्हते.

०८. हे म्हणणे खरे आहे की, भांडण साधारणपणे १५ ते २० मिनिटे चालले होते. हे म्हणणे खरे आहे की, १५ ते २० मिनिटांनंतर आरोपी क्र. १ गॅरेजमधून निघून गेला. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या गॅरेजसमोर बियरचे दुकान नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, बाजूला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दुकानापासून बियरचे दुकान ५ मिनिटांच्या अंतरावर आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, बाजूलाच आहे. आरोपी क्र. १ गॅरेजमधून निघून गेल्यानंतर पुन्हा पाच मिनिटांच्या आतच गॅरेजमध्ये आला.

०९. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने दारुची बाटली डोक्यात मारल्यानंतर माझ्या डोक्यातून रक्त येत होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझे रक्ताने माखलेले कपडे जप्त केले नाहीत. माझ्या फिर्यादीतील मजकूर की, 'त्यावेळी भांडणाच्या ओरडण्याचा आवाज ऐकू आला. त्यावेळी माझ्या घराच्या जवळील माझे काका विजय गोळे, वडील सुभाष गोळे, आई ज्योती व काकी सुषमा ही धावत आली आणि त्यांनी सोडवणूक करतेवेळी आरोपी क्र. १ ने बाटली मारली.' हा मजकूर बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या सरतपासात सांगितले आहे की, बाटली मारल्यानंतर नातेवाईक आले हा मजकूर बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या फिर्यादीमध्ये सांगितले नव्हते की, माझे सर्व नातेवाईक अपंग आहेत. माझे फक्त काका व वडील अपंग आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या सरतपासामध्ये सर्व नातेवाईक अपंग आहेत हे चुकीचे सांगितलेले आहे.

१०. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घरातील लोकांना मारहाण झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घरच्या लोकांना कोणतीही दुखापत झाली नव्हती. घटना संपेपर्यंत ८.३० ते ९.०० वाजले होते. हे म्हणणे खरे आहे की, वावे ते रेवदंडा हे १५ मिनिटांचे अंतर आहे. मी पोलीस ठाण्यात अंदाजे ९.१५ वाजता पोहोचलो. उपचारासाठी अंदाजे अर्धा तास लागला होता. उपचार संपेपर्यंत अंदाजे ९.४५ वाजले होते. उपचारासाठी वेळ लागला होता त्यामुळे फिर्याद उशीरा दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला कुठलीही मारहाण केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी गॅरेजमध्ये आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार माझ्या परिचयाचे आहेत. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, पोलीस माझ्या ओळखीचे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या घरच्यांनी संगनमताने आरोपींविरुद्ध खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणतीही दुखापत झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणतेही उपचार घेतले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **०२/०७/२०२५**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **८/२०२५**
निशाणी क्र. **२१/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **प्रविण प्रभाकर मोरे** |
| वय सुमारे | : | ४० वर्षे, व्यवसाय : पोलीस पाटील |
| निवासस्थान | : | मु. मल्याण, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहा. सरकारी वकील श्रीमती छापेकर यांचेमार्फत</u>** :

दि. १०/१२/२०२४ रोजी पोलीसांनी मला घटनास्थळाच्या पंचनाम्यासाठी बोलावले होते. घटनास्थळी मारामारी झाली होती. घटनास्थळ वावे येथील गोळे यांचे गॅरेज होते. सनी गोळे यांनी घटनास्थळ व बियरच्या बाटलीचे तुकडे दाखवले. बियरच्या बाटलीचे तुकडे पोलीसांनी जप्त करुन सिल करुन लेबलवर आमच्या सह्या घेतल्या. बाटलीचे तुकडे पोलीसांनी पिशवीमध्ये भरले होते. आता मला दाखवण्यात आलेले बाटलीचे तुकडे भौतिक वस्तू–१ (MO-1) तेच आहेत. लेबलवर अनु.क्र. २ वर माझी सही आहे. त्यानंतर पोलीसांनी जागेचे फोटो काढले. पोलीसांनी जागेचा नकाश बनवला. त्यानंतर पोलीसांनी माहिती लिहून घेतली व पंचनाम्यावर सह्या घेतल्या. पंचनामा १७.४५ वाजता सुरु झाला व १८.४० वाजता पूर्ण झाला. आता मला दाखवण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. २ वर माझी सही आहे. घटनास्थळाच्या पंचनाम्यासोबत घटनास्थळाचा नकाशा देखील तयार करण्यात आला होता. घटनास्थळाचा नकाशा हा घटनथळाच्या पंचनाम्याचा भाग असल्याने घटनास्थळाचा पंचनामा व घटनास्थळाचा नकाशा यांना एकत्रितपणे **निशाणी क्र. २२** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. गौरव पाटील यांचेमार्फत</u>** :

०२. मी पोलीस पाटील आहे. घटनास्थळ हे माझ्या परिचयाचे आहे. फिर्यादी माझ्या परिचयाचा नाही. हे म्हणणे खरे आहे की, बियरची बॉटल सहजरित्या उपलब्ध होते. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांच्या सांगण्यावरुन खूप वेळा पंचनाम्याकरीता गेलेलो आहे. मी ४–५ वेळा पंचनाम्याला गेलेलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचा पगार पोलीस ठाण्यामार्फत काढला जातो. हे म्हणणे खरे आहे की, आम्हाला पोलीसांच्या सांगण्याप्रमाणे काम करावे लागते. घटनास्थळ हे कोणाच्या मालकीचे आहे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या मालकीसंदर्भात पोलीसांनी कागदपत्रे घेतली नव्हती.

०३. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे पंक्चर काढण्याचे ठिकाण आहे. हे म्हणणे खरे नाही की, तेथे चारचाकी वाहन दुरुस्तीचे काम केले जात नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांच्या सांगण्यावरुन पंचनाम्यासाठी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष काहीही जप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी जागेचा नकाशा तयार केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )

दिनांक : **११/०७/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **८/२०२५**
निशाणी क्र. **२३/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **सुभाष सुरेश गोळे** |
| वय सुमारे | : | ४५ वर्षे, व्यवसाय : बांगड्या विक्री |
| निवासस्थान | : | मु. वावे, पो. मल्याण, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एस्. एम्. छापेकर यांचेमार्फत</u>** :

माझ्या घरात मी, मुलगी, मुलगा, पत्नी असे राहतो. माझ्या आजूबाजूला भाडोत्री लोक राहतात. माझा मुलगा वावे येथे गॅरेजचे काम करतो. सदर गॅरेज आमचे आहे. गॅरेजमध्ये मुलगा चार चाकी वाहन दुरुस्ती व पंक्चर काढण्याचे काम करतो. तो पोलीस भरतीचा अभ्यास देखील करत बसतो. मुलगा सकाळी ८.०० वाजता गॅरेजमध्ये जातो व रात्री ९.०० ते ९.३० वाजता घरी परत येतो. आमचे घर व गॅरेज यांमध्ये पाच मिनिटांचे अंतर आहे.

०२. दि. ०८/१२/२०२४ रोजी मी माझ्या मुलाच्या गॅरेजवर आवाज आल्यामुळे गेलो. माझ्या मुलाला तीन लोक मारहाण करत होते. ते माझ्या मुलाला हाताबुक्यांनी मारहाण करत होते. त्यानंतर त्यांनी माझ्या मुलाच्या डोक्यावर बाटलीने मारले त्यामुळे त्याच्या डोक्यातून रक्त येत होते. रोहीत, रमेश व राजाराम हे माझ्या मुलाला मारहाण करत होते. मी व माझी पत्नी आवाज आल्यानंतर गॅरेजवर गेलो होतो. रोहीत, रमेश व राजाराम हे घटनेच्या वेळी दारु प्यायलेल्या अवस्थेत होते. त्यानंतर मी माझ्या मुलाला घेवून मोटरसायकलवरुन पोलीस

ठाण्यात गेलो. पोलीसांनी रक्त येत असल्यामुळे आम्हाला हॉस्पीटलमध्ये जाण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही हॉस्पीटलमध्ये जावून औषधोपचार घेवून पुन्हा पोलीस ठाण्यात आलो. पोलीस ठाण्यात फिर्याद दिली व आम्ही घरी गेलो. मी आरोपींना ओळखतो. ते आज न्यायालयात हजर आहेत. माझ्या मुलाच्या डोक्यावर ज्या बाटलीने मारहाण केली होती ती दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखण्यात आलेली फुटलेली बियरची बाटली भौतिक वस्तू–१ (MO-1) तिच आहे.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. गौरव पाटील यांचेमार्फत</u>** :

०३. हे म्हणणे खरे आहे की, माझे घर व गॅरेजमधील अंतर पाच ते दहा मिनिटांचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी अपंग आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला एखाद्या ठिकाणी पोहोचण्यासाठी दुसऱ्यापेक्षा अधिक वेळ लागतो. हे म्हणणे खरे आहे की, आवाज आल्यानंतर मी पाच मिनिटांनी घटनास्थळी पोहोचलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, गॅरेजच्या आजूबाजूला बरीच दुकाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आजूबाजूच्या दुकानातील लोक घटनास्थळी गोळा झाली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, वावे नाका हे वर्दळीचे ठिकाण आहे.

०४. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपींना बाटलीने मारताना प्रत्यक्ष पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी मी व माझी पत्नी असे दोघेच गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी, माझी पत्नी व मुलगा यांच्याव्यतिरिक्त घटनास्थळी कोणीच नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद देण्यासाठी मी व माझा मुलगा दोघेच गेलो होतो. साक्षीदार सांगतो की, लोक मागाहून आले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा दारु पितो. हे म्हणणे खरे नाही की, तो दारु

पिवून पडल्यामुळे त्याला जखम झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, साक्ष कशी द्यायची हे मला सरकारी वकीलांनी सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलाच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी मारहाणीची घटना घडली नव्हती.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **११/०७/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **८/२०२५**
निशाणी क्र. **२५/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०४** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **विजय बाबासाहेब गोळे** |
| वय सुमारे | : | ४५ वर्षे, व्यवसाय : बांगडी विक्री |
| निवासस्थान | : | मु. वावे, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

घटना दि. ०८/१२/२०२४ रोजी रात्री ८:०० वाजता घडली. मी जिथे राहतो त्याच्या बाजूला सनी गोळेचे गॅरेज आहे. तेथे आवाज ऐकू आल्याने मी घराबाहेर आलो. माझा भाऊ सुभाष गोळे व त्याची पत्नी ज्योती गोळे असे आम्ही तिघे चौघे बाहेर आलो. त्यानंतर आम्ही पाहीले की, रोहीत वाघमारे याने सनीच्या डोक्यावर पाठीमागून बॉटल मारली. त्यावेळी तेथे रोहीत वाघमारे, पवार व दुसरा एक वाघमारे नावाचा इसम हजर होता. तिघांना पाहिल्यास मी ओळखू शकेन. आज आरोपी न्यायालयात हजर आहेत. पवार व दुसरा आरोपी भांडणामध्ये होते. बॉटल डोक्यात मारल्यामुळे सनीच्या डोक्यातून रक्त येत होते. ज्या बाटलीने मारहाण केली होती ती दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेल्या फुटलेल्या बाटलीचे तुकडे भौतिक वस्तू–१ (MO-1) तेच आहेत.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. गौरव पाटील यांचेमार्फत</u>** :

०२. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी हा माझा पुतण्या आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे पंक्चर काढण्याचे दुकान आहे. हे म्हणणे खरे आहे की,

फिर्यादी फक्त टायर पंक्चरचे काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, वावे नाका हा रहदारीचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, तेथे नेहमीच वर्दळ चालू असते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी इतर लोक जमा झाले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, रात्री ८:०० वाजता काळोख असतो. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्याला स्ट्रीट लाईट नाहीत. साक्षीदार सांगतो की, दुकानासमोर लाईटस् आहेत. मी पाच मिनिटांत घटनास्थळी पोहोचलो. घटना अंदाजे अर्धा तास चालू होती. हे म्हणणे खरे नाही की, मी भांडण पाहिले नव्हते.

०३. हे म्हणणे खरे आहे की, घटना घडत असताना आरोपी क्र. १ घटनास्थळ सोडून बाहेर गेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ घटनास्थळ सोडून बाहेर जावून बियरची बाटली विकत घेवून आला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, भौतिक वस्तू–१ सारख्या बियरच्या बॉटल कुठेही पडलेल्या मिळतात. हे म्हणणे खरे आहे की, गॅरेज येथे कोणीही येवू जावू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पुतण्याच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी पुतण्याला बियरच्या बाटलीने मारहाण केली नव्हती. पोलीसांनी माझा जबाब त्याच दिवशी घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी पुन्हा पोलीस ठाण्यात गेलो नव्हतो.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **२९/१०/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

**R.C.No. 8/2025**
Exh. **29/C**

Deposition of Witness No. **05** for the State

I do hereby on solemn affirmation state that :-

| | | |
|---|---|---|
| My Name | : | **Dr. Soniya Vijaykumar Jadhav** |
| Age about | : | 37 Years, |
| Occupation | : | Medical Officer, Primary Health Center, Revdanda |
| Office | : | Primary Health Center, Revdanda |

**Examination-in-Chief by A.P.P. Shri. P. S. Patil** :

01. I am qualified as B.A.M.S. On 08/12/2024 I was attached to Primary Health Center, Revdanda as a Medical Officer. On that day at about 8:45 p.m. I was on my duty. At that time the patients namely Suny Subhash Gole, aged about 21 years came to the hospital. He was brought by the relatives and he had injury on his head. He narrated me the history of assault by known person. On that day I examined him and found following injury :

Laceration over head size 4x5 cm linear.

02. He narrated me that he was assaulted by glass bottle on his head. The nature of injury was simple. It was caused within 12 hours. The patient was given treatment of suturing the wound and he was discharged after giving the medicines.

03. Suny Gole was accompanied by Jyoti Subhash Gole, aged 35 years. She was also assaulted. She was having abrasion injury over right side of elbow size 2 x 3 cm. It was fresh and was simple in nature.

04. I have also examined Sushma Gole, aged about 30

years. She had abrasion over right hand thumb. The injury was simple in nature.

05. Subhash Gole, Vijay Babasaheb Gole also came to the hospital, but they were not having any injury. The police had taken the injury certificates from the hospital. Accordingly, I issued injury certificates. The injury certificates now showed to me are the same. Its contents are true and correct and it bears my signature. The five injury certificates are marked as **Exh. 30** to **34**. If the person is hit by glass bottle, the bottle may break. The injuries caused to Suny Gole are possible by Material Object-1 (M.O.-1) broken glass bottle.

**Examination-in-Chief over**.

**Cross-Examination for accused by Adv. Shri. Gaurav Patil** :

06. It is true to say that if the person is hit by glass bottle on his head then the pieces of the glass may be found in the injury. It is true to say that I have not mentioned in the injury certificate regarding any pieces of glass in the injury. It is true to say that the incised wound is possible if the person is assaulted by glass bottle. It is true to say that the patient was not having incised injury. It may be possible that if the person is hit by glass bottle and if the bottle breaks then the other injuries of cut by glass pieces on the body of the patient is possible. It is not true to say that if there are no other injury on the body of the person then the lacerated wound on the body of the person is doubtful.

07. It is true to say that if the person is hit by unbroken glass bottle then the impact will be of blunt injury. It is not true to

say that if there is a blunt trauma to a person then the impact will of blunt injury only. It is true to say that the patients had not narrated me the name of the accused. It is true to say that I have mentioned that the injury is caused by glass bottle as per the say of the injured Suny Gole. It is true to say that I have not mentioned anything in remark column. It is not true to say that I have not written anything in remark column because I was not knowing how the injury is caused. It is not true to say that the injury is possible if the person falls down on rough surface.

08. As per the medical certificate I have examined the patient on 08/12/2024. The injury certificates are written personally by me. It is not true to say that on the same day of examination of the patient the injury certificate has to be filled by us. It is not true to say that as per the say of police we fill the medical certificate.

09. It is not true to say that I have not written date and time of examination in injury certificate of patient Suny Gole. It is true to say that in injury certificate Exh. 30 date and time of examination is blank. In injury certificate Exh. 30 to 34 I don't know who had written indification mark. It is true to say that it is necessary to mention indification mark on injury certificate. It is true to say that the patient's thumb impression or signature is not taken on injury certificate. Witness volunteers that it is taken on MLC register. It is true to say that below indification mark the signatures are taken on 10/12/2024.

10. It is true to say that I have not mentioned in the injury certificate that the patient Suny Gole was given sutures. It is true to say that if the injury is fresh then there is active bleeding. It is true to say that if the injury is old about 1 to 3 hours then the clotting starts. It is true to say that after 6 to 12 hours there is dry clotting. It is true to say that after 12 to 18 hours the clotting is dark brown and black colour. It is true to say that I have mentioned injury within 12 hours. It is not true to say that the injury caused to Suny Gole may be before 12 hours.

11. It is true to say that the injury caused to Jyoti may be possible due to fall on rough surface. It is not true to say that the injury caused to Sushma may be possible while working in home or in farm. It is not true to say that I have not examined any patient. It is not true to say that I am deposing false on the say of police.

Cross-examination Over.

No Re-examination

R. O. & A. C.

( **M. B. Attar** )
Chief Judicial Magistrate,
Raigad-Alibag

Alibag.
Dt. **17/11/2025.**

:: <u>**C E R T I F I C A T E**</u> ::

Taken before me and signed by me in the presence of accused to whom the deposition is explained in vernacular and full opportunity to cross-examine the witness, is given.

( **M. B. Attar** )
Chief Judicial Magistrate,
Raigad-Alibag

Alibag.
Dt. **17/11/2025.**